
ISSN 2250-1215

वनराई

www.vanarai.org

VANARAI । पुणे । वर्ष : २८ वे । अंक : पहिला ।
जानेवारी २०१९ । किंमत : ₹ २०/-।
वार्षिक वर्गणी : ₹ ४००/- । पृष्ठ संख्या ५२



# अंतरंग

वर्ष २८ वे । अंक पहिला । डिसेंबर २०१९

◆ **आर्थिक वृद्धी की शाश्वत विकास?**
– डॉ. गुरुदास नूलकर ---------------------------------------- १०

◆ **शहरातील निसर्ग जपण्यासाठी...**
– स्वाती गोळे---------------------------------------- १५

◆ **जमिनीच्या नात्याचा बदलता पोत**
– गिरिजा गोडबोले ---------------------------------------- १८

◆ **गुन्हेगारीचा नव्हे; 'संघर्षा'चा मुळशी पॅटर्न...**
– अश्विनी सातव-डोके---------------------------------------- २२

◆ **मगरपट्टा सिटी : शाश्वत आणि पर्यावरणपूरक विकासाचे मॉडेल**
– गंगाधर बनसोडे---------------------------------------- २६

◆ **गुंठामंत्री**
– दशरथ यादव ---------------------------------------- ३०

◆ **चित्रपट परिचय – मुळाशीच चपराक देणारा मुळशी पॅटर्न**
– धम्मरत्न जावळे ---------------------------------------- ३१

◆ **पुस्तक परिचय – गावकुसातले हबकमुड्डे**
– श्रीनिवास खेर---------------------------------------- ३५

◆ **वनराई अपडे'टेड' – शुद्ध बीजापोटी...**
– शारिक आझाद---------------------------------------- ३७

◆ **एकच लक्ष्य : स्थानिक वृक्ष – मोहात पाडणारा 'मोह'**
– बसवंत विठाबाई बाबाराव---------------------------------------- ४२

◆ **'कायद्या'चं बोला... – बिगर शेतकऱ्याशी व्यवहार**
– शेखर गायकवाड (भा.प्र.से.) ---------------------------------------- ४६

◆ **कृती एक परिणाम अनेक... – ऑपरेशन कॅट ड्रॉप**
– डॉ. हेमा साने ---------------------------------------- ४७

(अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# आर्थिक वृद्धी की शाश्वत विकास?



डॉ. गुरुदास नूलकर

"आर्थिक वृद्धी म्हणजेच विकास असे मानून केवळ आर्थिक वाढीचा पाठपुरावा करून भारतासारख्या विकसनशील देशातील समस्या सुटणार नाहीत. त्यासाठी समाजहिताची न्याय्य धोरणे, समान संधी आणि संसाधनांची समान उपलब्धता आणि त्यांचा विवेकी उपभोग या बाबींवरही लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे, तरच आपल्याला अपेक्षित असणारा खराखुरा 'शाश्वत विकास' साधता येणार आहे."



पहिल्या महायुद्धानंतर म्हणजे १९२९च्या सुमारास अमेरिकेच्या बाजारपेठेत मागणी घटत चालली होती. न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजमध्ये मंदीचे सावट आले आणि २९ ऑक्टोबर १९२९ रोजी स्टॉक एक्स्चेंज कोसळले. कारखान्यांच्या उत्पादनात घट झाली, युरोप आणि अमेरिकेत मोठ्या प्रमाणात नोकऱ्या गेल्या आणि १९३३ सालापर्यंत याचे रूपांतर 'ग्रेट डिप्रेशन' अर्थात प्रचंड मंदीत झाले. अर्थतज्ज्ञ जॉन मेनारड केन्सने 'The Means to Prosperity' या पुस्तकात मंदीतून बाहेर येण्याचा मार्ग सुचविला होता. त्यात केन्स म्हणतात की, बाजारातील एकूण मागणी (aggregate demand) घटल्याने मंदी आली आणि त्याचे रूपांतर ग्रेट डिप्रेशनमध्ये झाले. केन्सच्या मते बाजारपेठेतील मागणी ही अर्थव्यवस्थेचे मर्म असते आणि सरकारी धोरणातून मागणी वाढविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. सरकारने सार्वजनिक कामांवर खर्च वाढविला तर सरकारी पैसा बाजारपेठेत येईल आणि जनतेची खर्च करण्याची क्षमता वाढेल. यामुळे उद्योगांना चालना मिळेल, नोकऱ्या वाढतील आणि आर्थिक वृद्धी सुरू होईल. नंतर 'Treatise on Money' या पुस्तकात केन्स म्हणतात– जर बचतीचे व्याजदर वाढविले तर खर्चापेक्षा बचत अधिक होईल आणि बाजार मागणी घटेल. यामुळे पुन्हा मंदी येऊन बेरोजगारी वाढू

शकेल. आर्थिक सुबत्ता वाढविण्यास केन्सने उपभोग म्हणजे 'कंझ्युमरइझम' वाढवण्याची दिशा दिली. आर्थिक वृद्धी मोजण्यासाठी सायमन कुझनेट्स या अर्थतज्ज्ञाने राष्ट्रीय सकल उत्पन्न म्हणजे जी.डी. पी.चे मापन करण्यास सुचविले.

नवअभिजात अर्थशास्त्रावर आधारित अर्थव्यवस्थेत आजही केन्स आणि कुझनेट्सचे सल्ले तंतोतंत पाळले जातात. अर्थव्यवस्थेला 'कन्झम्प्शन ड्रीव्हन ग्रोथ' (consumption driven growth) म्हणजे उपभोगातून आर्थिक वृद्धी हे गणित चपखल बसले आणि आर्थिक वृद्धी हाच मानवी विकासाचा मार्ग आहे, हा दृढ विश्वास राजकीय धोरणातून दिसू लागला; पण उपभोग वाढविताना नैसर्गिक संसाधनांचा उपसा आणि प्रदूषण या दोन्हीत वाढ होणार याचा विचार केलेला नसतो आणि आज नेमक्या याच गोष्टींचे रूपांतर जागतिक पर्यावरणीय समस्यांमध्ये झाले आहे. निसर्गाची कार्बन पचविण्याच्या क्षमतेतील घट, समुद्रांचे अम्लीकरण, हवा-माती-पाणी यांचे प्रदूषण आणि या सगळ्याची निष्पत्ती म्हणजे हवामान बदल - या मानवी आर्थिक क्रियांतून उद्भविलेल्या समस्या आज संपूर्ण सजीवसृष्टीला भेडसावत आहेत. याच बरोबर आर्थिक विषमता, गरीब राष्ट्रांमध्ये असणारी पोषण विषमता, प्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या संपत्तीतील दरी, याही गोष्टी अर्थव्यवस्थेतून निपजल्या आहेत, यात दुमत नाही. हे निर्विवाद असताना केवळ आर्थिक वाढीचा पाठपुरावा करून मानवी सौख्य आणि स्वास्थ्य लाभेल यावर विश्वास का ठेवावा?

आर्थिक वृद्धी आणि मानवी विकास हे समान अर्थी शब्द नाहीत हे अनेक अर्थतज्ज्ञांनी बजाविले होते. तरीही आज जी.डी.पी.ला अनेक माध्यमातून 'विकास दर' असे सररास म्हटले जाते. वृद्धी ही संख्यात्मक असते आणि विकास गुणात्मक असतो. जी.डी.पी. हे सांख्यिक माप आहे, याने विकासाचे

| आर्थिक वृद्धी | विकास | सामाजिक कल्याण | शाश्वत विकास |
|---|---|---|---|
| अन्नसुरक्षा | अन्नसुरक्षा | अन्नसुरक्षा | अन्नसुरक्षा |
| औद्योगिक उत्पादनक्षमता | औद्योगिक उत्पादनक्षमता | औद्योगिक उत्पादनक्षमता | औद्योगिक उत्पादनक्षमता |
| कार्यक्षमता | कार्यक्षमता | कार्यक्षमता | कार्यक्षमता |
| बांधील भांडवलाची उपलब्धता | बांधील भांडवलाची उपलब्धता | बांधील भांडवलाची समान उपलब्धता | बांधील भांडवलाची समान उपलब्धता |
| | आर्थिक समता | आर्थिक समता | अर्थनिर्मितीच्या रचनेतून आर्थिक समता |
| | शिक्षण संधी आणि उपजीविकेच्या साधनांची उपलब्धता | शिक्षण संधी आणि उपजीविकेच्या साधनांची उपलब्धता | शिक्षण संधी आणि उपजीविकेच्या साधनांची समान उपलब्धता |
| | | सामाजिक कल्याणदायी धोरणे | सामाजिक कल्याणदायी धोरणे |
| | | | पर्यावरणीय कल्याणदायी धोरणे |
| | | | नैसर्गिक संसाधनांचे मूल्यांकन, हिशेब आणि संवर्धन |
| | | | नैसर्गिक परिसंस्थांच्या सेवांचे मूल्यांकन आणि नैसर्गिक उत्पादनक्षमतेचे संवर्धन |
| | | | विवेकी उपभोग |

(स्रोत : डॉ. गोपाल काडेकोडी* यांच्या मूळ तक्त्यात लेखकाने भर घालून आणि काही बदल करून तक्ता पुनःसंपादित केला आहे.)

मापन होत नाही. आज या विचारात आणखी सुधारणा होऊन यात आता चार संज्ञा आहेत. आर्थिक वृद्धी, मानवी विकास, सामाजिक कल्याण आणि शाश्वत विकास (economic growth, human development, social welfare and sustainable development). मागील तक्त्यात या संज्ञांच्या व्याप्तीमधले फरक दाखविले आहेत.

आपल्या देशातील आजच्या समस्या केवळ आर्थिक वृद्धीने सुटणार नाहीत, हे स्पष्ट आहे. इतर तीनही संज्ञांचा पाठपुरावा होणे गरजेचे आहे. एखाद्या आराखड्याची अंमलबजावणी चोख होत आहे की नाही, हे पडताळण्यासाठी सक्षम निकष असले पाहिजेत. सर्वांगीण विकासाला फक्त जी.डी.पी. चे मोजमाप हा निकष उपयुक्त नाही. मग समाजातील इतर कोणत्या परिवर्तनाचे मापन झाले पाहिजे, हे पुढे पाहू.

**शाश्वत विकासात अभिप्रेत भांडवलाचे पाच प्रकार**

राजकीय अर्थव्यवस्थेत आर्थिक भांडवलाला सर्वाधिक महत्त्व दिले जाते, त्यामुळे माध्यमांकडून सरकारच्या कारकिर्दीचे मूल्यांकन जी.डी.पी.ने होते आणि आर्थिक भांडवलात वृद्धी करणे हा राष्ट्रीय ध्यास होऊन जातो. सामाजिक विकासाच्या पाठपुराव्यात भांडवलाचा विचार अधिक व्यापक असायला हवा आणि त्यांच्या वृद्धीचे मापनही झाले पाहिजे. यात आर्थिक भांडवलाव्यतिरिक्त इतर चार प्रकारची भांडवले आहेत (चित्र १ पाहा).




**शाश्वत विकासात अभिप्रेत असलेले भांडवलाचे पाच प्रकार व श्रेणी**

या प्रारूपाप्रमाणे एकमेव आर्थिक भांडवलात वाढ होऊन मानवी विकास होत नाही तर इतर चार भांडवलेही जोपासली गेली पाहिजेत. नैसर्गिक भांडवल हा भांडवलाचा सर्वश्रेष्ठ प्रकार. यातूनच आर्थिक भांडवलाची निर्मिती होऊ शकते; पण याला साथ हवी ती सामाजिक आणि मनुष्यबळाच्या भांडवलाची, ज्यामुळे नैसर्गिक भांडवलातून आर्थिक आणि बांधील भांडवल तयार होऊ शकते.

- **नैसर्गिक भांडवल** – यात सर्व प्रकारच्या नैसर्गिक संसाधनांचा साठा आणि परिसंस्थांचे स्वास्थ्य यांची गणना होते. विपुल निसर्गातून जीवनावश्यक वस्तू आणि सेवा यांचा पुरवठा होत असतो. उत्पादनासाठी लागणारा कच्चा मालही या भांडवलातून मिळतो, त्यामुळे इतर सर्व भांडवले नैसर्गिक भांडवलानंतर येतात. निसर्गातून धातू, इंधन, पाणी, वायू, लाकूड, खनिज, जमीन, माती या सर्व गोष्टी मिळतात ज्यामुळे अर्थनिर्मिती शक्य होते. ज्या देशात नैसर्गिक भांडवल मुबलक आहे, त्याची सधन होण्याची अधिक क्षमता आहे.

  ब्रिटिशपूर्व भारतात नैसर्गिक भांडवल मुबलक होते, त्यामुळे ब्रिटिश कारखान्यांना इथून पुरवठा होत गेला आणि नैसर्गिक भांडवलाची लूट झाली. स्वातंत्र्यानंतर भारताने मुक्त बाजारपेठ अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला आणि उपभोगातून आर्थिक वृद्धीचा (कन्झम्प्शन ड्रीव्हन ग्रोथचा) पाठपुरावा वाढत गेला. परिणामी जंगले साफ होत गेली, खनिज उत्खनन वाढत गेले, इंधनाचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आणि संसाधने निर्यात होऊ लागली. यामुळे देशाचे नैसर्गिक भांडवल घटत चालले आहे. आज देशातील अनेक खाणी रिकाम्या झाल्या आहेत. खनिज तेल आणि कोळशाचा साठा संपण्याच्या मार्गावर आहे, त्यामुळे आयात वाढली आहे आणि अर्थसंकल्पातील तूट मोठी होत गेली



आहे. याहीपेक्षा अधिक चिंताजनक बाब म्हणजे येणाऱ्या पिढ्यांना अनेक संसाधनांसाठी आयातीवर अवलंबून राहावे लागणार आहे.


■ **सामाजिक भांडवल –** या भांडवलात समाजातील एकोपा, विश्वास, एकमेकांत विनिमय करण्याची इच्छा, सांस्कृतिक देवाण-घेवाण अशा गोष्टी आहेत. चांगले समाजस्वास्थ्य व्यापाराला पोषक असते. हे भांडवल वाढण्यासाठी आर्थिक समता असणे फार महत्त्वाचे आहे. विषम समाजात 'आहे रे' आणि 'नाही रे' यांना उपलब्ध असलेल्या संधींमध्ये तफावत होत जाते आणि त्यामुळे भावनांचा उद्रेक होऊ शकतो. याबरोबर सार्वजनिक सोयी सुविधा, शिक्षणाचा उत्तम दर्जा, संशोधनाला प्रोत्साहन अशा गोष्टीही महत्त्वाच्या आहेत.

भारताच्या तुलनेत अफगाणिस्तान किंवा सोमालिया या राष्ट्रांमध्ये या भांडवलाचा तुटवडा आहे. तिथे टोकाची आर्थिक विषमता आहे आणि समाजात शांतता नाही. एकमेकांवर विश्वास कमी आणि सांस्कृतिक गोष्टींवर निर्बंध आहेत. त्यामुळे आर्थिक आणि बांधील भांडवलाच्या वृद्धीची उणीव आहे आणि उद्योजकांना पोषक वातावरण नाही. असे असताना नैसर्गिक संसाधनांचे इथे करायचे काय, म्हणून परकीय कंपन्यांना संसाधन साठे सोपविले जातात.

■ **मनुष्यबळाचे भांडवल –** हे भांडवल सबळ असले तर देशातील उद्योग क्षेत्राचा विकास होऊ शकतो. यात जनतेचे सरासरी शिक्षण, हातोटी, कल्पकता, बुद्धिमत्ता आणि शारीरिक श्रम करण्याची क्षमता या गोष्टींची गणना होते. भारताने अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान यात मोठी प्रगती केली, कारण या उद्योगासाठी अत्यंत पोषक वातावरण निर्माण झाले त्यामुळे यात देश पुढे जाऊ शकला.

इटली आणि डेनमार्क यांची लोकसंख्या घटत चालली आहे. तिथे तरुण कमी आणि वयस्कर जास्त आहेत. अशा देशांत कामगार मिळत नाहीत आणि आर्थिक प्रगती खुंटते. भारतात हे भांडवल मुबलक असल्याने आर्थिक वाढीला पोषक आहे. सरकारने या भांडवलाच्या वृद्धीवर अधिक भर दिला पाहिजे. यासाठी मूलभूत सुविधा, अन्न सुरक्षा आणि पोषण समता, कौशल्य प्रशिक्षण, उत्तम शिक्षणाची समान उपलब्धता, नवीन पिढीच्या गरजेनुसार शिक्षण पद्धतीमध्ये बदल अशा गोष्टींवर तातडीने काम व्हायला हवे.

■ **बांधील भांडवल –** उद्योग क्षेत्राची पुढील गरज असते ती बांधील भांडवलाची. यात रस्ते, बंदर, विमानतळ, योग्य वसाहत, दळणवळण अशा गोष्टींची गणना होते. यांच्या साहाय्याने अर्थनिर्मिती होऊ शकते. पाकिस्तानमध्ये बांधील भांडवल अपुरे आणि कमी दर्जाचे असल्याने



तिथे तरुण उद्योजकांना भारतासारखे वातावरण नाही. प्रगत राष्ट्रात हे भांडवल अधिक सक्षम असते. बांधील भांडवल वाढविण्याचे भारत सरकारचे प्रयास आहेत, तरीही आज अनेक ठिकाणी वीज आणि पाणी पुरवठा बेभरवशाचा आहे. ग्रामीण भागातील रस्ते खराब आहेत. शेतकऱ्यांना धान्य साठवण्याची गुदामे उपलब्ध नाहीत. या कारणांमुळे आपल्या देशातील बांधील भांडवलात खूपच कसर आहे.

- **आर्थिक भांडवल –** पहिली चार भांडवले संपन्न असली की आर्थिक भांडवल वाढीची प्रक्रिया सुलभ होते. आर्थिक वाढ हे एकच ध्येय डोळ्यासमोर ठेवले तर इतर भांडवलांचे महत्त्व दृष्टीआड जाते आणि त्यांची जबाबदारीदेखील सरकारचीच आहे, याचा समाजाला आणि माध्यमांना विसर पडतो. दुर्दैवाने आज आर्थिक आणि बांधील भांडवलांकडे सर्वांचे लक्ष असते; पण इतर भांडवल प्रकार दुर्लक्षित राहतात.

परिपूर्ण मानवी विकास होण्यासाठी पाचही प्रकारच्या भांडवलात वृद्धी होणे अपेक्षित आहे, त्यामुळे यांचे मापन करणे आणि समाजाने याबाबतीत सजग राहणे गरजेचे आहे. पर्यावरणीय अर्थशास्त्राचे तज्ज्ञ हरमन दाली म्हणतात की, एका टप्प्यापर्यंत जी.डी.पी.ची वाढ आणि मानवी सौख्य यात समांतर वाढ होते, परंतु त्यानंतर जी.डी.पी. वाढविण्याचा सामाजिक आणि पर्यावरणीय खर्च हा त्यांपासून मिळणाऱ्या फायद्यापेक्षा अधिक असतो. याला अर्थशास्त्रात 'लॉ ऑफ डीमिनीशिंग रिटरन्स' म्हणजे 'घटत्या फलाचा सिद्धांत' म्हणतात.



आज आर्थिक वृद्धीला अवाजवी महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे अर्थातच नैसर्गिक भांडवल घटत जाणार आणि सामाजिक भांडवल कमकुवत होत जाणार हेही ध्यानात ठेवले पाहिजे. तीव्र विषमतेचा आज अनेक ठिकाणी उद्रेक होत आहे आणि नैसर्गिक परिसंस्था निकृष्ट होत चालल्या आहेत, त्यामुळे समाजस्वास्थ्य घटतच चालले आहे आणि सजीवसृष्टीला पोसण्याची पृथ्वीची क्षमता कमी होत चालली आहे. याचा परिणाम म्हणजे आपल्या आर्थिक हव्यासापोटी आपण पुढल्या पिढ्यांना निकृष्ट वसुंधरा बहाल करून जाणार आहोत.

* Environmental Economics – An Indian Perspective. Edited by Rabindra N.Bhattacharya. Chapter 5 – Environment and Dvelopment by Gopal K.Kadekodi. Oxford India Paperbacks, 2001.

**लेखक शाश्वत विकासाचे अभ्यासक असून 'सिम्बायोसीस आंतरराष्ट्रीय विद्यापीठा'मध्ये प्राध्यापक आहेत. 'इकॉलॉजिकल सोसायटी'चे ते विश्वस्त आहेत.**

**संपर्क** : gurudasn@gmail.com

⊙⊙⊙

## हरित शब्दशोध क्र. ५ उत्तरे

**आडवे शब्द : १. जलसंचय, ४. करवत, ५. सखल, ७. माची, ९. कळक, १०. वाळवण**
**उभे शब्द : १. जवस, २. संकलन, ३. यवतमाळ, ६. खडकाळ, ८. चीकण, ९. कण**

वनराई

# वनराई मासिक अंक सभासदत्वाचे नवीन पर्याय !

- पर्यावरण, शेती, ग्रामीण विकास, वनीकरण, जल-मृद संधारण या क्षेत्रांतील विषयांचा ऊहापोह करणारे मराठीतील वैशिष्ट्यपूर्ण नियतकालिक.
- विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, अभ्यासू नेते आणि सामाजिक संस्था यांच्या पसंतीस उतरलेले 'वनराई' मासिक आता 'पीडीएफ' स्वरूपातही उपलब्ध.
- मासिकाच्या सभासदत्वाचे आपल्याला आवडतील आणि परवडतील असे सुलभ पर्याय निवडून अंक घरपोहोच मिळवा.

| वर्ष | एकूण वर्गणी | तुमची बचत | तुम्ही भरायचे आहेत केवळ | पीडीएफ आवृत्ती |
|---|---|---|---|---|
| १ | ४५०/- | ५०/- | ४००/- | २००/- |
| ३ | १३५०/- | २००/- | ११५०/- | - |
| ५ | २२५०/- | ३५०/- | १९००/- | - |

वनराई, आदित्य रेसिडेन्सी, ४९८, पर्वती, मित्रमंडळ चौक, पुणे - ४११००९.
: ७७२००५६७३८ / (०२०) २४४२९३५१ / २४४२०३५१ : editor@vanarai.com : www.vanarai.org

**मासिक अंक - सभासद अर्ज**

सभासद क्र.: ______ दिनांक : ______ पावती क्र.:

सभासदाचे/संस्थेचे पूर्ण नाव : ______

पत्ता : ______

जवळची खूण : ______ गाव/शहर : ______

ता.: ______ जि.: ______ पिनकोड : ☐☐☐☐☐☐ राज्य : महाराष्ट्र/ ______

☑ रोख ☐ धनादेश ☐ डी. डी. ☐ मनी-ऑर्डर ☐ नेट-बँकिंग ☐ क्रमांक : ______ दिनांक : ______

मोबाइल / दूरध्वनी क्र.: १) ______ २) ______

इ-मेल : ______

**सभासद व्यक्ती असल्यास -**

**जन्मतारीख :** ______ ☑ आपण विद्यार्थी ☐/ शेतकरी ☐ / नोकरदार ☐ / व्यावसायिक ☐ आहात.

**सभासद संस्था असल्यास : संस्थेचा प्रकार -** ☑ खासगी ☐ शैक्षणिक ☐ स्वयंसेवी ☐ शासकीय ☐ सार्वजनिक ग्रंथालय ☐

**सभासद शुल्काचा तपशील (विशेषांक व पोस्टेजसहित)** ☑ वार्षिक ₹ ४००/- ☐ त्रैवार्षिक ₹ ११५०/- ☐ पंचवार्षिक ₹ १९००/- ☐

सभासद शुल्क ₹ ______ सभासदत्वाचा कालावधी : ______ पासून ______ पर्यंत

वनराईकरिता

वनराई मासिकाचे सभासद झाल्याबद्दल आभार!

सही : ______

नाव : ______

ठिकाण : ______ दिनांक : ______

वरील अर्ज भरून वनराई कार्यालयाच्या पत्त्यावर/इ-मेल/व्हॉट्स ॲपवर पाठवावा.